दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २९५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.१९ जानेवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# लसीकरणाची वर्षपूर्ति ही मोदी सरकारची अभिनंदनीय कामगिरी : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**रोजगार, शिक्षण, आणि उपजीविकेची सर्व साधने अबाधित रहावीत या उद्देशाने गेल्या वर्षभरात तंत्रज्ञानावर भर देत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राबविलेल्या जगातील सर्वात मोठ्या कोविड लसीकरण मोहिमेस काल एक वर्ष पूर्ण झाले. या काळात मोदी सरकारच्या कोरोनाविरोधी लढाईस लसीकरणामुळे मोठे बळ मिळाले असून देशाचे जनजीवन वेगाने पूर्वपदावर येत असल्याबद्दल भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोदी सरकारचे जाहीर अभिनंदन केले. एका बाजूला सर्वाधिक सुरक्षा उपायाचा अवलंब करतानाही जनजीवर पूर्वपदावर येण्याकरिता केंद्र सरकार आटोकाट प्रयत्न करीत असताना महाराष्ट्र मात्र पुन्हा सर्व व्यवहार बंद करून राज्याला अस्थिरतेकडे नेत आहे, असा आरोपही त्यांनी केला.**



गेल्या वर्षी, १६ जानेवारी २०२१ रोजी, मनीष कुमार नावाच्या ३४ वर्षांच्या सफाई कर्मचाऱ्यास कोविडविरोधी लसीची पहिली मात्रा देऊन या मोहिमेचा आरंभ करण्यात आला. १४ जानेवारी २०२२ रोजी या मोहिमेअंतर्गत लसीकरणाच्या १५६ कोटी मात्रा पूर्ण झाल्या असून, ९३ टक्के जनतेचे पहिल्या मात्रेचे तर ७० टक्के जनतेचे दोनही मात्रांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. दररोज सरासरी ४३ लाख लोकांचे लसीकरण करणारी जगातील ही सर्वाधिक वेगवान मोहीम मोदी सरकारमुळेच देशात राबविली गेल्याने देशाला कोविडविरोधी सुरक्षेचे मोठे कवच प्राप्त झाले आहे, असे ते म्हणाले. कालपर्यंत देशातील १५ ते १८ वयोगटातील ४३ टक्के युवकांना पहिली मात्रा पूर्ण झाली आहे, अशी माहितीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

तेलंगणा, गोवा, सिक्कीम, दादरा–नगरहवेली, दीव–दमण, लडाख, लक्षद्वीप येथे पहिल्या मात्रेचे १०० टक्के लसीकरण पूर्ण झाले असून मोहिमेच्या पहिल्या ७८ दिवसांतच भारताने १०० कोटी लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करून जागतिक स्तराव मोठी आघाडी नोंदविली आहे. १७ सप्टेंबर या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी, एकाच दिवशी अडीच कोटी लसीकरण करून जगभरातील लसीकरणाच्या मोहिमांतील विक्रमही भारतानेच प्रस्थापित केला, ही अभिमानास्पद बाब आहे, असे ते म्हणाले. केवळ देशांतर्गत लसीकरणच नव्हे, तर वसुधैव कुटुम्बकम या वैश्विक भावनेने व सर्वे भवन्तु सुखिनः या सांस्कृतिक परंपरेनुसार जगातील ९४ हून अधिक देशांना सव्वासात कोटी लसमात्रांचा पुरवठा करून मोदी सरकारने विश्वकल्याणाच्या संस्काराचे दर्शन घडविले आहे, असे गौरवोद्गार आ.प्रशांत ठाकूर यांनी काढले. संख्येच्या हिशेबात पाहता, भारताने इंग्लंडच्या लसीकरणाच्या २३ पट, जर्मनीच्या १९ पट, फ्रान्सच्या २३ पट, ब्राझीलच्या आठ पट, जपानच्या १२ पट, इटलीच्या २६ पट, स्पेनच्या ३३ पट, तर कोरियाच्या ३० पटीने अधिक लसीकरण विक्रमी वेळात पूर्ण केले, अशी माहिति त्यांनी दिली.

संपूर्ण जग कोविड महामारीमुळे आर्थिक संकटाशी सामना करत असताना, भारताचा विकास दर मात्र उंचावत असून मोदी सरकारच्या आर्थिक नीतीमुळे विकासदराचा आलेख उंचावताना दिसत आहे. कोविडकाळातदेखील भारताचा महागाई निर्देशांक सहा टक्क्यांहून सातत्याने कमी राहिला असून अर्थव्यवस्था झपाट्याने पूर्वपदावर येण्याचा वेग ९७.६ टक्के, म्हणजे जगाच्या तुलनेत सर्वाधिक राहिला.

जगभरातील अनेक वित्तसंस्था व अनेक राष्ट्रांच्या प्रमुखांनी याबद्दल मोदी सरकारची प्रशंसा केली असून भारताची प्रतिष्ठा उंचावल्याबद्दल मोदी सरकार अभिनंदनास पात्र आहे, अशी भावनाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली. याच काळात भारतातील राजकीय नेते मात्र, अपयशाचे खापर मोदी सरकारवर फोडण्याचा अपयशी प्रयत्न करत होते, व अपप्रचारात मग्न होते अशी टीकाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोणाचेही नाव न घेता केली. लसीकरणाबाबत जनतेत संभ्रम माजविण्याचे प्रयत्नही काही नेत्यांनी केले, पण भारतीय जनतेने मोदी सरकारवर दाखविलेल्या विश्वासामुळे असे नेते तोंडघशी पडले, असा टोलाही त्यांनी हाणला. कोविडशी झुंजत देश झपाट्याने पुढे जात असताना महाराष्ट्र सरकार मात्र, शिक्षणव्यवस्थेस टाळे लावून अनेक नवे निर्बंध लादत राज्याला मागे नेत आहे, अशी खंतही आ.प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

# ६० लाख ७२ हजार रुपयाच्या सुगंधीत तंबाखूसह गुटखा जप्त ; ७ आरोपी गजाआड




**दै.रायगड नगरी । पनवेल**

कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन ६०,७२,००० / – रुपये किंमतीचा प्रतिबंधित सुगंधीत तंबाखू व पानमसाला (गुटखा) साठयासह चार टेम्पो जप्त करून ०७ आरोपी गजाआड करण्यात आले आहेत. या त्यांच्या धडक कारवाईमुळे बेकायदेशीररित्या असा व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

नशा मुक्त नवी मुंबई या अभियानाचे अनुशंगाने अंमली पदार्थ साठा, खरेदी विक्री व व्यसन करणाऱ्या इसमांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबच्या आदेशा प्रमाणे कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन काम सुरू असतांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांना गोपनिय बातमीदारामार्फत महापे एमआयडीसी परिसरात मोठया प्रमाणात गुटख्याचा साठा करण्यात आला असून त्याची विक्री होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून पोलीस उप आयुक्त, सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर भागामध्ये कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन गस्त व सापळा रचण्यात आला होता. दरम्यान महापे एम.आय.डी.सी मधील टाटा मोटर्स परिसरातील पी.ए. पीए २०२ या गोडावुन जवळ चार संशयीत टेम्पो दिसुन आल्याने त्यापैकी एका टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये विमल गुटखा मिळून आला. त्यानंतर चारही टेम्पोची तपासणी करता सदर ठिकाणी मिळून आलेल्या चारही टेम्पो मध्ये विमल गुटखा भरलेला आढळुन आला त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी सदरचा विमल गुटखा त्या ठिकाणचे गोडावुन मधुन टेम्पोमध्ये भरल्याचे टेम्पो चालकांनी सांगितले. नमुद गोडावूनमध्ये जावुन पाहणी केली असता तेथेही गुटखा मिळुन आल्याने सदर ठिकाणी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सुरक्षा अधिकारी राहूल संपतराव ताकाटे यांना तात्काळ बोलावुन पंचासमक्ष एकुण ४२,७२,०००/ – रुपये किंमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखू व पानमसाला (विमल गुटखा) व गुन्हा करण्याकरिता वापरलेली १८,००,०००/– रुपये किंमतीची एकुण ०४ टेम्पो जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्हयात एकुण ६०,७२,००० /– किंमतीचा मुद्देमाल जप्त ०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आरोपी इसरार अहमद नियाज अहमद शेख वय ४५ वर्षे, रा. ठाणे रोड, भिवंडी, जि. ठाणे सुरज हरिश ठक्कर वय ४१ वर्षे, रा. डोंबिवली ( पूर्व ) जि. ठाणे ३ सस्तु रामेत यादव वय ३४ वर्षे, रा.शितलगंज, जि.गौंडा, राज्य उत्तर प्रदेश, नितीन बाबूराव कसबे वय ४९ वर्षे, रा. मुलुंड पश्चिम मुंबई ५ नौरुद्दीन अलिशौकत सय्यद वय २६ वर्षे, रा. मानखुर्द मुंबई मोहम्मद नफिस रफिक शेख वय ३४ वर्षे, रा. दहिसर मोरी , ता. जि. ठाणे २ ४ ७ पवनकुमार पन्नालाल श्रीवास्तव वय २७ वर्षे, रा. नवी मुंबई हे आहेत. सदर आरोपी हे महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधी तंबाखू व एमआयडीसी पानसाला (विमल गुटखा) परराज्यातुन छुप्या मार्गाने कमी दराने खरेदी करून, परिसरातील गोडावुन भाडयाने घेवुन त्याठिकाणी साठा करून छोटया छोटया टेम्पोमधुन नवी मुंबई, मुंबई , ठाणे परिसरातील व्यावसायीकांना जादा दराने विक्री करण्याकरीता घेवुन जात असत.

# मुंबईत आयएनएस रणवीरमध्ये भीषण स्फोट, तीन जवानांना हौतात्म्य

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील नौदलाचा तळ असलेल्या नेव्हल डॉकयार्डमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. येथे असलेल्या आयएनएस रणवीरमध्ये भीषण स्फोट झाला आहे. या स्फोटात नौदलाचे तीन जवान हुतात्मा झाले आहेत. दरम्यान जहाजावरील कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. मात्र जहाजाला फार मोठं नुकसान झालेलं नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार आज नेव्हल डॉकयार्डमध्ये आयएनएस रणवीरच्या अंतर्गत भागात भीषण स्फोट झाला.

या स्फोटानंतर जहाजावरील कर्मचाऱ्यांनी तातडीने पावले उचलत परिस्थिती नियंत्रणात आणली. या स्फोटात जहाजाचे फारसे नुकसान झालेलेले नाही. तसेच हा स्फोट कशामुळे झाला याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## संक्षिप्त...

# ३९ हजार २०७ कोरोनाबाधितांची नोंद तर ५३ जणांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील कोरोनाची रुग्णसंख्येत चढ–उतार दिसून येत आहे. गेल्या २४ तासात राज्यात कोरोनाच्या ३९ हजार २०७ नव्या रुग्णांची भर झाली असून ५३ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात गेल्या २४ तासात ३८, ८२४ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. या आधी रुग्णसंख्या ४० हजारांच्या वर असायची, त्यात आता घट होत असल्याचं दिसून येतंय.

राज्यात आज एकाही ओमायक्रॉनबाधित रुग्णांची नोंद झालेली नाही. आतापर्यंत १८६० ओमायक्रॉनबाधितांची नोंद राज्यात झाली आहे. त्यापैकी १००१ रुग्ण ओमायक्रॉनमुक्त झाले आहे. राज्यात आज ५३ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर १.९५ टक्के झाला आहे. राज्यात आतापर्यंत ६८ लाख ६८ हजार ८१६ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४.३२ टक्के आहे. सध्या राज्यात २३ लाख ४४ हजार ९१९ व्यक्ती होम क्वॉरंटाईनमध्ये आहेत तर २९६० व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. राज्यात आजपर्यंत ७२ लाख ८२ हजार १२८ प्रयोगशाळा तपासण्या करण्यात आल्या आहे. मुंबईत सोमवारी ५ हजार ५५६ नवे कोरोना बाधित आढळले होते पण आज मात्र ६ हजार १४९ नवे रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे प्रशासनाने दिलेले सतर्क राहण्याचे आवाहन पाळणे गरजेचे आहे. मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या आकडेवारीनुसार, मुंबईत मंगळवारी ६ हजार १४९ नवे रुग्ण आढळले असून ७ जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

# प्रशासकीय कामकाज मराठी भाषा वापरासंबंधीच्या तक्रारी व निवारणासाठी मराठी भाषा समितीमध्ये पनवेलच्या आयुक्तांना स्थान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रशासकीय कामकाजात मराठी भाषा वापरासंबंधीच्या तक्रारी व निवारणासाठी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१, अधि सूचनेनुसार या अधिनियमातील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर न करण्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन तक्रारींचे निवारण करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील केंद्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, विमा कंपन्या, रेल्वे तसेच अन्य केंद्रीय आस्थापना या सर्व कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येतो किंवा कसे याबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व मराठी भाषेसंदर्भातील उपक्रम राबविण्यासाठी मराठी भाषा समिती गठीत करण्यात आली असून पनवेल महापालिकेच्या आयुक्तांना यात स्थान देण्यात आले आहे. अध्यक्षपदी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर हे असून उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के–पाटील हे सदस्य सचिवपदी आहेत.

समितीचे सदस्य म्हणून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, पनवेल महानगरपालिका आयुक्त, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), श्री.मकरंद प्रभाकर बारटक्के, मु.पो.ता.रोहा, श्रीमती सुजाता पाटील, मुख्याध्यापिका, सृजन विद्यालय, कुरुळ अदींची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती या समितीचे सदस्य सचिव उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव म्हस्के–पाटील यांनी दिली आहे.

प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर न करण्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन तक्रारींचे निवारण करण्यासाठी कार्यक्षेत्रातील केंद्रीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, विमा कंपन्या, रेल्वे तसेच अन्य केंद्रीय आस्थापना या सर्व कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येतोय किंवा नाही या संबंधी तक्रारींचे निवारण करण्याचे काम या समितीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे असल्याचे आयुक्त गणेश देशमुख सांगितले.

# तळा नगरपंचायत उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद

**दै.रायगड नगरी । तळा**

जिल्ह्यात सर्वात जास्त चर्चेत असलेली व लहान असलेली तळानगरपंचायतीची निवडणूक चार मतदान केंद्रावर पार पडली.

सर्व मतदान केंद्रावर शांततेत व पोलीस बंदोबस्तात ही निवडणूक पार पडली असून एकूण ७५ टक्के मतदान झाले आहे, प्रभाग क्रमांक १४ वगळता कोणत्याही मतदान केंद्रावर फारशी गर्दी दिसून आलेले नाही मात्र सर्वच पक्षाचे उमेदवार या निवडणूक रिंगणात उभे असल्यामुळे सर्वच पक्षाचे कार्यकर्ते मतदान केंद्राच्या बाहेर डेरे दाखल झालेले होते. प्रत्येक वार्ड मध्ये मतदार कमी आणि पक्षाचे कार्यकर्ते जास्त दिसत होते.

या निवडणुकीमध्ये कोण बाजी मारेल हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही,दुपार नंतर ही काही मतदार कुणाकडून काही अर्थिक लाभ मिळेल का या आशेवर मतदान करण्याला उशीर लावत होते अशी चर्चा सुरू होती, कारण या निवडणुकीमध्ये मतदानाच्या एक दिवस आधी पडद्यामागे बऱ्याच गोष्टी घडलेल्या होत्या,अनेकांना लक्ष्मी चे दर्शन झाले काही पक्षाच्या उमेदवारांनी या निवडणुकीसाठी लाखोंचा खर्च केला असल्याचे खासगीत बोलले जात आहे, या पडद्या मागील राजकारणामुळे अनेक चांगल्या उमेदवाराचे गणित बिघडणार असल्याचे चिन्ह आहे. मतदारांनी नेमका कौल कोणाला दिला हे उद्या सकाळी मतमोजणीत स्पष्ट होईल सध्यातरी कोणत्याच पक्षाला बहुमत मिळणार नसल्याचे स्पष्ट चिन्ह आहे.

# सीमा शुल्क विभागाच्या प्रधान आयुक्ताला ऑनलाईन गंडा

**दै.रायगड नगरी । उरण**

सध्या माहिती तंत्रज्ञानाचे युग असून देशात देखिल जास्तीत जास्त व्यवहार इंटरनेट द्वारे केले जात आहेत. या माहिती तंत्रज्ञानाचा गैरफायदा उठवत काही ठगानी ऑनलाईन फसवणूकीचा धंदाच सुरू केला आहे. या फसवणूकीचा फटका सर्व सामान्यांपासून ते क्लासवन अधिकाऱ्यांना देखिल बसू लागला आहे. सिमाशुल्क विभागाच्या प्रधान आयुक्त पदावर असलेल्या उमारेड्डी निरंजन यांना अशाच प्रकारे ऑनलाईन फसवणूकीला सामोरे जावे लागले आहे.

त्यांना एका ऑनलाईन व्यवहारात ३५ हजार रूपयांचा गंडा घालण्यात आला आहे. जवाहरलाल नेहरू सिमा शुल्क भवनमध्ये प्रधान आयुक्त असलेले उमारेड्डी निरंजन यांचे हैद्राबाद येथिल घर भाड्याने द्यायचे होते.त्यासाठी त्यांनी मॅजिकब्रीक्स डॉट कॉम या संकेतस्थळावर त्याची जाहिरात दिली होती. त्या अनुषंगाने त्यांना रणदिप सिंग या कथित सीआयएसएफ मधिल अधिकाऱ्याने हे घर भाड्याने घेण्याची इच्छा व्यक्त केली.


त्यानंतर रणदिपसिंग याने गुगल पे वरून तुम्हाला सिक्यरिटी डिपॉझिटची रक्कम पाठवतो असे सांगून त्यांच्याकडून त्यांच्या गुगल पे संबधीतील पासवर्डची माहिती जाणून घेतली. आणि निरंजन यांना मोबाईल संभाषणामध्ये अडकवून ठेवून त्यांच्या खात्यातून ३५ हजार रूपये काढले. काही वेळानंतर मेसेज आल्यानंतर निरंजन यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यानी या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात रणदिप सिंग आणि आणखी एका अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक मधुकर भटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस या बाबत अधिक तपास करत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपशब्द व बेताल वक्तव्य करणाऱ्या नाना पटोलेंवर गुन्हा दाखल करुन कारवाई करा

## भारतीय जनता पार्टीतर्फे मुरुड तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपशब्द व बेताल वक्तव्य करुन अपमान करणाऱ्या काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात यावी. याबाबत भारतीय जनता पार्टीतर्फे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुड तहसीलदार यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे. यावेळी महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांनी निवेदन स्वीकारले.



काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वाचाळवीर नाना पटोले यांनी दि.१७ जानेवारी २०२२ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल बेताल वक्तव्य करत आपले संस्कार आणि पक्षाची संस्कृती दाखविली आहे.याचा आम्ही मुरुड तालुका भारतीय जनता पार्टीतर्फे जाहीर निषेध करतो. असे भा.ज.पा. तर्फे तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कर्तुत्ववाच्या उंची समोर नाना पटोले पासंगाला ही पुसणार नाहीत. याबाबत पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करीत आहोत व त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊन कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी शासनाकडे करीत असल्याचे म्हटले आहे. भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष विनोद (बाळा) भगत, सरचिटणीस नरेश वारगे, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, महेश मानकर, कामगार आघाडी तालुकाध्यक्ष प्रवीण भाटकर, अभिजित पानवलकर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मा.गोडसे सो।

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१९८५/२०२१
ने.ता.२८/०२/२०२२

श्री.सतीश दत्ताराम सनगरे व वगैरे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.दत्ताराम देवजी सनगरे यांचे निधन दि.२५/१०/२०२१ राजी झाले. श्री.सतीश दत्ताराम सनगरे व वगैरे ह्यांनी कै.दत्ताराम देवजी सनगरे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**अ) पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील निल ऑरचिड को.ऑप.हौ.सो.लि. या इमारतीमधील तळमजला, दुकान नं.०६, प्लॉट नं.४१, सेक्टर १०, क्षेत्र १४.०० चौ.मी. बिल्टअप.**

**ब) पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील गोकुळ कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ.सो.लि. या इमारतीमधील दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०३, बिल्डींग नं.०२, सर्व्हे नं.०६ व ०७, हिस्सा नं.०२, चटई क्षेत्र ४७३.०० चौ.फुट बाल्कनी सहीत.**

कै.दत्ताराम देवजी सनगरे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्रं.१ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही हे कायदेशीर वारसदार नाहीत. सबब, अर्जदार क्रं.१ ते ३ यांनी सदरचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकत न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार क्रं.१ ते ३ यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# तहसीलदार, वन विभाग कडून खारघर मधील खाडी पट्ट्याची पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल वन विभाग आणि पनवेल तहसीलदार कार्यालयातील अधिकाऱ्यांनी खारघर मधील खाडीतील खारफुटीची पाहणी केली.या पाहणीत काही ठिकाणी मासळी आणि कोळंबीसाठी खोदकाम केल्याचे आढळून आले.

रोडपाली तसेच खारघर येथील खाडी पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर कांदळवनांचा नाश आणि जमीन घशात घालण्याचे सत्र सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. जेसीबी द्वारे भराव टावून खाडी पट्ट्यात सपाटीकरणाचे काम सुरु आहे. एकीकडे कांदळवने लवकरात लवकर वन विभागाकडे हस्तांतरित करावीत, असे आदेश नुकतेच महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण मंत्री ना. आदित्य ठाकरे यांनी दिले आहेत. तर दुसरीकडे बिनदिक्कत कांदळवनांची कत्तल केली जात आहे. राज्य शासनाच्या वन विभागाने कांदळवनाचे नुकसान वाचवावे अन्यथा कांदळवनांचे कधीही भरुन न काढता येणारे नुकसान होणार आहे.

त्याचा विपरीत परिणाम खारघर, कळंबोली, कामोठे सारख्या शहरासाठी नुकसानकारक ठरण्याची शक्यता असल्याच्या तक्रारी नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि श्री एकविरा आई प्रतिष्ठान तर्फे स्थानिक पर्यावरण प्रेमानी राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि उच्च न्यायालय नियुक्त कांदळवन समितीकडे करण्यात आल्या आहेत. या तक्रारींची दखल घेऊन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी वन सचिवांना तातडीने या प्रकरणी लक्ष घालण्याचे आदेश सचिव वेणुगोपाल यांना दिले आहेत. सदर तक्रारीची दखल मुख्यमंत्र्यांनी घेतल्यावर पनवेल वन विभाग अधिकारी आणि पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांनी खारघर सेक्टर-१६ लगत असलेल्या खाडीची पाहणी केली. या पाहणीत कांदळवनाचा नाश करुन कोळंबी पैदाससाठी खोदकाम केल्याचे निदर्शनास आले.

खारघर सेक्टर-१६ परिसरातील खाडी क्षेत्रातील कांदळवनात पाहणी केला असता, केलेले खोदकाम जुने असल्याचे दिसून आले. सदर खोदकाम केव्हा करण्यात आले याचा शोध वन विभाग घेणार असून, त्यानंतर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांनी सांगितले.

# वांगणी ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीतील दोन्ही उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वांगणी ग्रामपंचायतीच्या प्रभाग क्रमांक ३ मधील रिक्त झालेल्या एक जागेसाठी आज वांगणी ग्रामपंचायतीमध्ये पोटनिवडणुक घेण्यात आली. या पोटनिवडणुकीत सुमारे ८६ टक्के मतदान झाले आहे. बुधवार दि. १९ जानेवारीला या निवडणूकीचा निकाल लागणार आहे.

वांगणीतील प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांचा मागास प्रवर्ग या राखीव जागेसाठी निवडून आलेले सदस्य हिराचंद तेलंगे यांचे सदस्यत्व जातपडताळणी समितीकडून रद्द झाल्याने ही पोटनिवडणुक घेण्यात आली. शेकाप, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीचे उमेदवार एकनाथ ठाकूर व मनसेचे हिराचंद दळवी यांच्यात होणाऱ्या सरळ लढतीत दोन्ही उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीत कोणाची लॉटरी लागणार ते उदयाच कळणार असल्याने सर्वांची उत्कंठा शिगेला पोचली आहे. दरम्यान वांगणी येथील राजिप प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रातील बुथवर सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा ७११ मतदारांपैकी ६०८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. वांगणी ग्रामपंचायतीच्या या पोटनिवडणुकीमध्ये उत्स्फूर्तपणे मतदान झाले असल्याने वांगणी मधील मतदारांसह विभागातील नागरिकांची निकालाविषयीची उत्कंठा शिगेला पोचली आहे.

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.१९९७ प्रमाणे मौजे : उलवे नोड येथे सेक्टर क्र.१८, भूखंड क्र.१८ डी, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्रीमती.वासंती काशिनाथ कोळी व श्री.अमोल काशिनाथ कोळी रा.४५९, उरण कोळीवाडा, उरण पोलीस स्टेशन जवळ, उरण, ता.उरण, जि.रायगड यांच्या सहमालकीची व ताबेकब्जातील भूखंड आहे.

श्रीमती.वासंती काशिनाथ कोळी व श्री.अमोल काशिनाथ कोळी यांनी त्यांचे सहमालकीचा मौजे : उलवे नोड येथे सेक्टर क्र.१८, भूखंड क्र.१८ डी, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा मे.सुभद्रा इंटरप्रायझेस तर्फे प्रो.श्रीमती. सुभद्रा फुलगेंद यादव रा.फ्लॅट क्र.२०५, प्लॉट क्र.९ व १०, सेक्टर क्र.५०, आयुशी ह.गृ.सं., ठाणे, नवी मुंबई यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि मे.सुभद्रा इंटरप्रायझेस तर्फे प्रो.श्रीमती.सुभद्रा फुलगेंद यादव हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.१८/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**कार्यालयीन पत्ता : १ मजला, श्री प्रेरणा अर्पा., उरण, ता.उरण, जि.रायगड**
**संपर्क : ९७०२२०९११४**

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सौ. रेणुका गजानन पाटील, रा.चाणजे, ता.उरण, जि.रायगड यांच्याा मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे.

**मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चाणजे | २९३ | २ | ०-५४-४० पो.ख.०-२०-०० | १३.७५ |

**(सदर एकूण शेत जमिन मिळकतीपैक एक एकर (०-४०-० गुंठे) शेत जमिनी विक्रीकरिता)**

सदर एकूण शेतजमीन मिळकतीपैकी एक एकर (०-४०-० गुंठे) शेतजमीन ही सौ.रेणुका गजानन पाटील ह्या आपल्या आर्थिक गरज भासविण्याकरिता सौ.योगिता रजनीश सरोज, पत्ता : घर क्र.११३ अ, उरण-करंजा रोड, पालवी हॉस्पिटल जवळ, उरण, ता.उरण, जि.रायगड यांस कायमस्वरुपी विक्री करण्याचे ठरविले आहे. सबब कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकाराच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत आहे असे मानण्यात येईल.

दि.१८/०१/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**कार्यालयीन पत्ता : १ मजला, श्री प्रेरणा अर्पा., उरण, ता.उरण, जि.रायगड**
**संपर्क : ९७०२२०९११४**

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र.मोकल

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.२०८/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२४/०१/२०२२

(कै.बुधुबाई उर्फ बुधीबाई उर्फ बुधाबाई उर्फ आयतुबाई सिताराम कडू यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.धर्मेंद्र हरिश्चंद्र उर्फ हरिचंद्र कडू
वय : ४६, धंदा : नोकरी
रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड-४००७०७
२) श्री.अनिल हरिश्चंद्र कडू
वय : ४०, धंदा : नोकरी
रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड-४००७०७
३) सौ.भारती बाळकृष्ण कणेकर
वय : ३९, धंदा : गृहिणी
रा.दादरपाडा, ता.उरण, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.बुधुबाई उर्फ बुधीबाई उर्फ बुधाबाई उर्फ आयतुबाई सिताराम कडू यांचे निधन दि.०८/१२/२०१५ रोजी त्यांच्या राहत्या घरी मु.सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे झालेले आहे. कै.बुधुबाई उर्फ बुधीबाई उर्फ बुधाबाई उर्फ आयतुबाई सिताराम कडू यांच्या मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे वडिलोपार्जित मालकीची असलेली शेतजमीन सिडको प्रशासनाने नवी मुंबई करिता संपादीत केलेली आहे. सदर भूसंपादीत शेतजमिनीच्या संदर्भात साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील वर्णनाचे ॲवॉर्ड कै.बुधुबाई उर्फ बुधीबाई उर्फ बुधाबाई उर्फ आयतुबाई सिताराम कडू यांचे नावे वाटप झाले आहेत.

**अ) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ३३ | ९ | ००-१-८ | १३७/१७२ |

**ब) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ८ | ८ | ००-२-४ | १३७/७१ |
| २ | सोनारी | १५ | २ | ००-६-० | १३७/७१ |
| ३ | सोनारी | १९ | २ | ००-३-१२ | १३७/७१ |
| ४ | सोनारी | २२ | ३ | ००-१-० | १३७/७१ |
| ५ | सोनारी | २२ | ७ | ००-१-१२ | १३७/७१ |

**क) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ८ | ३ | ००-२-८ | १३७/१६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.बुधुबाई उर्फ बुधीबाई उर्फ बुधाबाई उर्फ आयतुबाई सिताराम कडू यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्याा कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : १५/१२/२०२१

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र.मोकल

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.२१०/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२७/०१/२०२२

(कै.हरिश्चंद्र उर्फ हरिचंद्र सिताराम कडू यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.धर्मेंद्र हरिश्चंद्र कडू
वय : ४६, धंदा : नोकरी
रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड-४००७०७
२) श्री.अनिल हरिश्चंद्र कडू
वय : ४०, धंदा : नोकरी
रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड-४००७०७
३) सौ.भारती बाळकृष्ण कणेकर
वय : ३९, धंदा : गृहिणी
रा.दादरपाडा, ता.उरण, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.हरिश्चंद्र उर्फ हरिचंद्र सिताराम कडू यांचे निधन दि.२५/०७/१९९१ रोजी त्यांच्या राहत्या घरी मु.सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे झालेले आहे. कै.हरिश्चंद्र उर्फ हरिचंद्र सिताराम कडू यांच्या मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे सामाईक वडिलोपार्जित मालकीची असलेली शेतजमीन सिडको प्रशासनाने नवी मुंबई करिता संपादीत केलेली आहे. सदर भूसंपादीत शेतजमिनीच्या संदर्भात साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील वर्णनाचे ॲवॉर्ड कै.हरिश्चंद्र सिताराम कडू यांचे नावे सामाईकरित्या वाटप झाले आहेत.

**अ) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ३३ | ९ | ००-१-८ | १३७/१७२ |

**ब) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ८ | ८ | ००-२-४ | १३७/७१ |
| २ | सोनारी | १५ | २ | ००-६-० | १३७/७१ |
| ३ | सोनारी | १९ | २ | ००-३-१२ | १३७/७१ |
| ४ | सोनारी | २२ | ३ | ००-१-० | १३७/७१ |
| ५ | सोनारी | २२ | ७ | ००-१-१२ | १३७/७१ |

**क) मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं./ ॲवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | ८ | ३ | ००-२-८ | १३७/१६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.हरिश्चंद्र उर्फ हरिचंद्र सिताराम कडू यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्याा कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : ०८/१२/२०२१

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# निविदा सूचना क्र.२१ सन २०२१-२०२२
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग

खालील कामाच्या बी-१ निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग दूरध्वनी क्रमांक २२२०८४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमूना कार्यकारी अभियंता, सा.बां.विग, अलिबाग यांच्या संकेत स्थळावर दि.१९/०१/२०२२ ते दि.२६/०१/२०२२ पर्यंत १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ऑनलाईन (www.mahapwd.com) वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा ऑनलाईन पद्धतीने दिनांक २७/०१/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि दि.२७/०१/२०२२ रोजी दुपारी १५.०१ वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसाऱ्याची रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी महिने | निविदेच्या नमुन्याचा प्रकार कोऱ्या निविदा नमुन्यांची किंमत (रुपये) | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस मुख्यालय अलिबाग येथे परेड मैदानातील शेडचे विस्तारीकरण करणे, ता.अलिबाग, जि.रायगड | रु.६,२८,२५६/- | ७,०००/- | ०३ महिने | ब-१ रु.५६०/- | वर्ग ७ व वरील |
| २ | पोलीस अधिक्षक रायगड कार्यालयातील मुख्य (समोरील बाजू) संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे ता.अलिबाग, जि.रायगड | रु.५,०९,२६६/- | ६,०००/- | ०३ महिने | ब-१ रु.५६०/- | वर्ग ७ व वरील |
| ३ | मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील आगरदांडा येथील नौका तळ येथे महिला प्रसाधनगृह व विश्रामगृहाचे बांधकाम करणे ता.मुरुड | रु.२,३३,३९१/- | ३,०००/- | ०३ महिने | ब-१ रु.२२४/- | वर्ग ९ व वरील |
| ४ | मुरुड येथील न्यायाधिश निवासस्थानाची दुरुस्ती करणे ता.मुरुड | रु.२,६४,०५६/- | ३,०००/- | ०३ महिने | ब-१ रु.२२४/- | वर्ग ९ व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

२) कोरी निविदा संच विक्री www.mahapwd.com या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहे.

३) इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची बी-१ निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

४) सर्व पात्र/इच्छुक निविदा कारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणासाठी ई-निविदा प्रणालीच्या www.mahapwd.com या Portal वर Enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र.अवि/लेशा/निविदा/     /२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अलिबाग सा.बां.विभाग, अलिबाग
दिनांक : १७/०१/२०२२

क्र.जिमाका/राअ/जाहिरात/२०६/७५/२०२२

**सही/-**
**(ज.ई.सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता**
**अलिबाग (सा.बां.) विभाग, अलिबाग**

मा.श्री.राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
सौ.सुप्रिया रुपेश मोरे
श्री.सागर सुरेश गोंधळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०३/२०२२

मयत कै.सारिका आनंद गायकवाड मयताचे वारस
सौ.कल्पना शिवाजी कांबळे
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.आर.सी.एफ.कॉलनी, टाईप-२, बिल्डींग नं.१६,
रुम नं.३५३, चेंबुर मुंबई, मुंबई-४०००७४ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार हिची बहिण मयत कै.सारिका आनंद गायकवाड ही दि.१२/०२/२०२१ रोजी राहत्या घरी मौजे आर.सी.एफ. कॉलनी टाईप-२, बिल्डींग नं.१६, रुम नं.३५३, चेंबुर मुंबई येथे मरण पावली आहे. सदर मयत कै.सारिका आनंद गायकवाड हिने तिचे मालकीच्या खालील वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकती बाबत अर्जदार यांचे लाभांत दि.२४/०३/२०२० रोजीचे मृत्यूपत्र / इच्छपत्र लिहून दिलेले आहे. सदर फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**
**मौजे : देवद, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

**फ्लॅट सदनिका क्र.१२, दुसरा मजला, सरस्वती को.ऑप.हौ.सोसा.लि., रजिस्टर नं.RGD/HSG/(TC)/2238/2008-09/YR.2009 सर्व्हे नं.२६, हिस्सा नं.०, पालीदेवद, ता.पनवेल, जि.रायगड**

आता सदर मयत कै.सारिका आनंद गायकवाड हिने अर्जदार हिच्या नावे वर नमूद मिळकतींबाबत लिहून दिलेल्या मृत्यूपत्र/इच्छापत्रचा प्रोबेट दाखला मिळण्याकरिता अर्जदार हिने मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे प्रोबेट दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्या अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे प्रोबेट दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१८ माहे ०१ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मुजावर सो.यांच्या कोर्टात

अर्जदाराचे वकील : अशोक ज.शेकडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.१९२८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०२/२०२२

श्रीम.शितल विश्वनाथ करकेरा व
श्रीमती.हेमलता कमलकांत राव
राहणार : रो.हाऊस नं.०३, प्लॉट नं.बी-६५,
नित्यानंद को.ऑ.हौ.सोसायटी, सेक्टर १२,
खारघर, नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

१) श्रीमती.शितल विश्वनाथ करकेरा व २) श्रीमती.हेमलता कमलकांत राव राहणार : रो.हाऊस नं.०३, प्लॉट नं.बी ६५, नित्यानंद को.ऑ.हौ. सोसायटी, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१०२१० हे मयत श्री.कमलकांत आनंद राव यांच्या खालील मालकी हक्क असलेली मिळकतीचे वारस आहेत.

| मिळकत | क्षेत्र | किंमत |
|---|---|---|
| कार्तिकेय पार्क सदन नं.सी.००२, बिल्डींग नं.२, शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड. सर्व्हे नं.१२ ए, ७ (२) ए व ७ (२) बी | ३८९ चौ.फूट अधिक ४३ चौ.फूट एफ.बी. | रु.२२,१८,७५० |

तरी श्रीमती.शितल विश्वनाथ करकेरा व श्रीमती.हेमलता कमलकांत राव अर्जदार यांनी मा.न्यायालयात वारसा प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केला असून सदर कोणास काही हरकत वा असे कोणास समजविण्याचे असेल तर या नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीत योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे न्यायालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल व त्यांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल. तसेच त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज १८ माहे १ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व या मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पेझारीत २३ जानेवारीला रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणार्या अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील श्रीपंत भक्त मंडळ संचलित गुरूवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठानने रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते स्व. प्रभाकर पाटील (भाऊ) यांच्या जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे यंदाही पेझारी येथील श्रीदत्त मंदिर सभागृहात शनिवार २३ जानेवारी २०२२ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. अशी माहिती श्रीपंत सांप्रदाय रायगड जिल्हा प्रमुख व प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर राणे यांनी दिली आहे.




हे रक्तदान शिबिर शनिवार २३ जानेवारी २०२२ रोजी पेझारी येथील श्रीदत्त मंदिर सभागृह येथे सकाळी १० ते २ या वेळात होणार आहे.गेली २३ वर्षे सातत्याने प्रतिष्ठान रक्तदान शिबिराचे आयोजन करत असून यंदाचे शिबिराचे हे २४ वे वर्ष आहे. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी आमदार पंडितशेठ पाटील यांच्या हस्ते होणार असून या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून या सामाजिक कार्यास हातभार लावावा. असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिगंबर राणे यांनी सांगितले आहे. रक्तदान शिबिराला येणाऱ्या सर्वांनी मास्कचा वापर करावा तसेच सामाजिक अंतराचे पालन करावे. असे प्रतिष्ठानकडून सांगण्यात आले आहे. इच्छुक रक्तदात्यांनी दिगंबर राणे ९४२२३७१०९८, दिनानाथ कडू ९४२२६९५०३९, निकेश पाटील ९८३४७६६१५६, मुकुंद म्हात्रे ९२२६३७०७७१, नरेश म्हात्रे ९३०९५०७३४२, सुमित राणे ९०२८४१४६१३ यांच्याशी संपर्क साधावा.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या टप्प्यातील ४ प्रभागांतील १६ उमेदवारांसह ४७ उमेदवारांचे भवितव्य आज समजणार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित चार प्रभागांतील निवडणुकीदरम्यान तिरंगी लढतीत भाजप, शिवसेना व काँग्रेस पक्षाच्या प्रत्येकी चार अशा एकूण १६ उमेदवारांचे भवितव्य मंगळवारी सकाळपासून हळूहळू इव्हिएम मतदान यंत्रामध्ये बंद झाले आहे. कोविड–१९च्या नियमावलीचे सर्वच मतदान केंद्रांमध्ये पालन केले जात होते. बुधवारी मतमोजणीनंतर पोलादपूर नगरपंचायतीवर सत्ता कोणाची स्थापन होणार किंवा त्रिशंकू नगरपंचायत राहणार याचा फैसला लागणार आहे.





प्रभाग २ मध्ये शिवसेनेचे मनोज प्रजापती, काँग्रेसचे कल्पेश मोहिते व भाजपाचे संभाजी माने मतदारांची रांग मोठी दिसून आली तरीही मतदारांचा उत्साह तुलनेत कमी दिसून आला. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत १८६ पुरूषांपैकी १६८ पुरूषांनी तर १९४ पैकी १५४ महिलांनी असे एकूण ३८० पैकी ३२२ मतदारांनी मतदान केले. प्रभाग ८ मध्ये शिवसेनेच्या सोनाली गायकवाड विरूध्द काँग्रेसच्या अनिता जांभळेकर या लढतीमध्ये भाजपच्या रचना धुमाळ या तिरंगी लढतीदरम्यान शंकरराव महाडीक न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पुरूष १७५ पैकी १५० पुरूषांनी तर १७३ महिलांपैकी १५१ महिलांनी मतदान केल्याने ३४८ पैकी ३०१ मतदारांनी मतदान केले. प्रभाग १० मध्ये शिवसेनेचे प्रसाद इंगवले विरूध्द काँग्रेसच्या शुभांगी चव्हाण तर भाजपचे प्रतिक सुर्वे यांच्या लढतीमध्ये मतदान प्राथमिक शाळा नं.१ मध्ये मतदान तुरळक सुरू होते. १४३ पुरूषांपैकी १२३ आणि १४४ महिला मतदारांपैकी १२४ महिलांनी असे एकूण २८७ पैकी २४७ मतदारांनी मतदान केले.

प्रभाग १४ मध्येदेखील शिवसेनेच्या प्राची सुतार विरूध्द काँग्रेसच्या प्रतिक्षा भूतकर या लढतीमध्ये भाजपच्या अंकिता जांभळेकर यांनी केलेल्या निकराच्या प्रचारानंतरही मतदारांचा प्रतिसाद हळूहळू दिसून येत असून मतद–ारांमध्ये उदासिनता दिसून आली तरी शेवटच्या तासाभरात मतदानाची टक्केवारी सर्वत्र ७०–८० टक्क्यांदरम्यान राहिल असे चित्र जाणवत आहे. केवळ १३६ मतदार असलेल्या या प्रभागातील ६५ पुरूष मतदारांपैकी ५६ तर ७२ पैकी ६८ मतदारांनी प्राथमिक शाळा नं.१ मध्ये मतदान केल्याने १३७ पैकी १२४ मतदान झाले आहे.

चारही प्रभागांमध्ये एकूण ११५२ मतदारसंख्या असताना ९९४ सरासरी ८६.२८ टक्के मतदान झाल्याची नोंद झाली आहे. प्रभाग १ सुनीता पार्टे, मीनल जगताप, प्रभाग २ मनोज प्रजापती, कल्पेश मोहिते, संभाजी माने, प्रभाग ३ रोहित सावंत, निखिल कापडेकर, विशाखा आंबेतकर, प्रभाग ४शिल्पा दरेकर, अर्चना शिंदे, प्रांजली भुवड, शीला बुटाला, प्रभाग ५ स्नेहा मेहता, अपर्णा कदम, माधुरी विचारे,प्रभाग ६ अस्मिता पवार, समिधा महाडीक, रश्मी दिक्षित, प्रभाग ७ सुषमा पवार, आशा गायकवाड, हर्षदा बोरकर,प्रभाग ८स़ोनाली गायकवाड, अनिता जांभळेकर, रचना धुमाळ, प्रभाग ९तेजश्री गरूड, मंजू मोरे, प्रभाग १० प्रसाद इंगवले, शुभांगी चव्हाण, प्रतिक सुर्वे, प्रभाग ११ सारिका पालकर, स्वप्नील भुवड, प्रभाग १२ मृगया शहा, श्रावणी शहा, प्रज्ञा सुर्वे, प्रभाग १३ सिध्देश शेठ, युवराज पवार, महेंद्र जाधव, प्रसन्ना पालांडे, प्रभाग १४ प्राची सुतार,प्रतिक्षा भूतकर, अंकिता जांभळेकर, प्रभाग १५ विनायक दिक्षीत, अनिलकुमार भोस–ले, तुषार पवार, एकनाथ कासुर्डे, प्रभाग १६ नागेश पवार, अजित खेडेकर, नितीन बोरकर, प्रभाग १७ सुरेश पवार, दिलीप भागवत, दर्पण दरेकर आदी ४७ उमेदवारांचे भवितव्य इव्हिएम मशिनमध्ये बंद झाले असून उद्या बुधवार, दि१९ जानेवारी २०२२ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत मतमोजणीला सुरूवात होणार आहे.

# प्रशासकपदी वीणा पाटील भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच रायगड जिल्हा

**दै.रायगड नगरी । दिघी**

भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रिडम स्टोरी ही संस्था नवोदित कवी, कवयित्रींना त्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करणारी आहे. या संस्थेने नवनवीन उपक्रम आयोजित करुन नवोदितांना संधी दिली आहे. नुकतीच या संस्थेच्या रायगड जिल्हा प्रशासक पदी वीणा विनोद पाटील यांची नियुक्ती करण्यात येत आहे असे संस्थेचे उपाध्यक्ष विजय जायभाये यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी येथिल रहिवासी असलेल्या विना पाटील या उत्तम लेखिका आणि कवयित्री असून त्यांचे लेख तसेच कविता वर्तमानपत्रात, दिवाळी अंक तसेच अनेक साहित्यातून प्रसिद्ध झाले. अनेक वॉट्सप समुहात उत्तम योगदान आहे. रेडीओ एफ एम वर रचना प्रसारित झालेल्या असून त्यांचे प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. यांची साहित्य, कला, सामाजिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील कामाची आवड पाहून त्यांना हे पद देण्यात आले आहे. या नियुक्ती बदल संस्थेच्या कार्याध्यक्षा आम्रपाली घाडगे, संस्थापक विशाल शिरसट, उपाध्यक्ष विजय जायभाये, शिल्पा मुसळे, रिया पवार, सिध्दार्थ आंबेकर, ऋतुजा मिसळे,ओंकार मेहेर,सार्थक जाधव, नम्रता भंदुरे, सरिता कलढोणे आणि इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी सौ.पाटील यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# हुतात्मा स्मृती दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील हुतात्मा महादेव हिरा पाटील, हुतात्मा केशव महादेव पाटील, हुतात्मा कमळाकर कृष्णा तांडेल, हुतात्मा नामदेव शंकर घरत, हुतात्मा रघुनाथ अर्जुन ठाकूर यांनी १९८४ साली देशासाठी दिलेले बलिदान हुतात्मा स्मृतिदिन म्हणून उरण तालुक्यात साजरा केला जातो.या हुतात्मा स्मृती दिनाचे औचित्य साधून जाणता प्रतिष्ठान पागोटे उरण व श्री साई ब्लड सेंटर पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद शाळा पागोटे, तालुका उरण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत पागोटे, ग्रामस्थ मंडळ पागोटे यांच्या सहकार्यातून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून एकूण २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.रक्तदान शिबिराचे उदघाटन आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते झाले. सर्व राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी या रक्तादन शिबिराला सदिच्छा भेट दिली व शुभेच्छा दिल्या. यावेळी उद्योजक रवीशेठ पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते जे एम म्हात्रे,तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल, जितेंद्र पाटील, योगेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोहे येथे तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

भारताचे माजी थोर अर्थमंत्री डॉ. सी.डी.उर्फ चिंतामणराव देशमुख यांच्या जयंती सोहळ्याचे औचित्य साधून रोहा प्रेस क्लब व रोहे तालुक्यातील सामाजिक संस्था तसेच रोहा सिटिझन फोरम यांच्या वतीने ता.१४ जाने.रोजी शासकीय विश्रामग्रुह येथे तालुकास्तरीय वत्क्रुत्व स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आल्या.

यावेळी रोह्यातील प्रसिद्ध राममारुती चौक येथील डॉ. सी.डी.देशमुख, प.पू.पांडुरंगशास्त्री आठवले,स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या भिंतीवरील प्रतिमांना पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर स्पर्धेच्या नियोजित स्थळी डॉ. सी.डी.देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमालिका अर्पण करण्यात आली. रोहे प्रेस क्लबचे मुख्य मार्गदर्शक मिलिंद अष्टिवकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष प्रदीप उर्फ अप्पा देशमुख, जेष्ठ पत्रकार दिलिप वडके, जि.प्रेस क्लब उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, प्रेस क्लब अध्यक्ष शशिकांत मोरे, सचिव नंदकुमार मरवडे, सदस्य रविंद्र कान्हेकर, केशव म्हस्के, उद्धव अव्हाड, अंजूम शेटे आदी उपस्थित होते.

कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर सर्व शासकीय कोरोना नियमावलीचे पालन करून या स्पर्धा संपन्न करण्यात आल्या.

या स्पर्धेत लहान गट––इ.७ वी ते १० वी या गटात प्रथम क्र. श्रवण वामन कदम, द्वितीय क्र.तनूजा निलेश जाधव, तृतीय क्र.––तेजेश परशुराम मनगुतकर तर उत्तेजनार्थ कीर्ती गोविंद महत हिने पटकावला आहे.तसेच खुला गटात प्रथम क्र. सूरज म्हशेळकर व द्वितीय क्र.निकिता बोथरे यांनी प्राप्त केले आहे. दोन्ही गटातील विजयी स्पर्धकांना पारितोषिके देऊन व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन कोरोना प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर प्रेस क्लबकडून आयोजित करण्यात येणाऱ्या एका कार्यक्रमात मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात येणार असल्याची माहिती प्रेस क्लबकडून देण्यात आली आहे.




मे.पांडे साहेब
प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे वकील श्री.सुयश अशोक कामेरकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.ज्यु.डी.मॅजी वर्ग १ ला यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.५४/२०२२
ने.ता.२१/०२/२०२२

श्री.कृष्णा शंकर घरत
वय : ६५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत केळवणे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा कै. शंकर माया घरत हे दि.५/९/१९७२ रोजी मौजे : केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून अर्जदार श्री.कृष्णा शंकर घरत रा.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी या न्यायालयात सदरहू कै.शंकर माया घरत यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.शंकर माया घरत ह्या वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तींचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१७/०१/२०२२ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



मा.गोडसे सो
ॲड.रेखा होवाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया. व.स्तर यांचे समोर
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज
अर्ज नं.२०३७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०२/२०२२

नलिना राजन
वय : ६२, धंदा : घरकाम
रा.बी.३९, सेक्टर–११, केंद्रीय विहार खारघर,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) श्रीविद्या बालाजी अय्यंगर
वय : ४०, धंदा :
रा.स.नं.१२९/४, फ्लॅट नं.ए/६०१,
प्लॅटीना अपार्टमेंट, वाकड, पुणे
२) विनिथ्रा राजन अय्यंगर
वय : ३५, धंदा :
रा.41, RU BERLIOZ, VERDUN
(QC) H3EIMI, Canada — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.चक्राराजन थिरुवेंकटचारी ह्यांचा मृत्यू दि.०९/०१/२०१७ मुंबई बी.ए.आर.सी येथे झाला. अर्जदार ह्या कै.चक्राराजन थिरुवेंकटचारी यांची पत्नी आहे. व सामनेवाला ह्या मुली आहे. आणि त्यांचे वारसाने खालील मिळकतीबद्दल वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

Name of the Property Holder :
Late Shri. CHAKRARAJAN THIRUVENKATACHARY.
B-39/7, Kendriya Vihar, Sector-11,
Kharghar, Tal-Panvel & Dist-Raigad.
Value Rs.7,43,907/- (Rupees Seven lakhs forty three thousand nine hundred seven only)

यासाठी वारस दाखला मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या. आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारांस त्यांचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख १८ माहे ०१ सन २०२२ बेलिफाकडे

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.श्री.मुजावर साहेब यांच्या कोर्टात
प्रोसेस जमा रु.१००/– अर्जदारातर्फे ॲड.विमल भगत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.२०३२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०३/२०२२

१) कु.अंकिता रामलाल येल्ले
वय : २५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.सदनिका क्रं.११, सी–१०३, सेक्टर नं.०६,
घणसोली, नवी मुंबई ४००७०१
२) कु.दिपेश रामलाल येल्ले
वय : २३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.सदनिका क्रं.११, सी–१०३, सेक्टर नं.०६,
घणसोली, नवी मुंबई ४००७०१ — अर्जदार

या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदारास नं.१ ची आई, तसेच अर्जदार नं.१ व २ चे आई कै.रेखा रामलाल येल्ले हे दि.३०/०४/२०२१ रोजी मौजे सिडको एक्झुबिशेन सेंटर सी.सी. सी. आणि डी.सी.एच.सी.वाशी, नवी मुंबई या ठिकाणी मयत झाले आहेत. सदर मयताचे मृत्यूचे पश्चात वरील अर्जदारांची कायदेशीर वारस नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे.

कै.रेखा रामलाल येल्ले हे मयत झाले असून त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावाची नोंद असलेले मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे (सदनिका क्रं.फ्लॅट नं.सी–२०१, बसावेश्वरा रेसिडेन्सी सर्व्हे नं.१०९) वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : डेरवली, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्रं.फ्लॅट नं.सी–२०१,**
**दुसरा मजला, बिल्डींग क्रमांक ०४,**
**बसावेश्वरा रेसिडेन्सी, सर्व्हे नं.१०९,**
**हिस्सा नं.१, २ आणि ३ गाव डेरवली,**
**ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

वरील मिळकतीचे सातबारावर कै.रेखा रामलाल येल्ले यांच्या नावाची नोंद आहे, परंतु ते आज रोजी हयात नाहीत त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांचे नोंद व्हावी म्हणून वरील अर्जदारांनी सदर अर्ज वारस दाखला मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. सदरहू अर्जदारांना वारसादाखला देण्याविषयी कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी दिलेल्या पुरावा ग्राह्य मानून अर्जदारांस वारसदाखला प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१७ माहे ०१/२०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.मुजावर सो
प्रोसेस जमा रु.५०/– अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रसाद वाकडीकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ/कनिष्ठ स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/०३/२०२२

कै.बाळाराम वालकू पाटील (मयत)
१) श्री.हरिभाऊ बाळाराम पाटील
वय : ८८ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.४२५, मु.कोपर–कोल्ही, पो.पारगाव,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६
२) सौ.तुळसाबाई हरिभाऊ पाटील
वय : ८३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१०१, मु.ओवळे, पो.पारगाव,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६
३) सौ.मनिषा विनायक झुगे
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१३००, मु.कोपर–कोल्ही, पो.पारगाव,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६
४) सौ.लक्ष्मी तुकाराम भोईर
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कोळखे, पो.ओएनजीसी,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.बाळाराम वालकू पाटील (मयत) यांचे दि.२८/०९/१९८७ रोजी मु.कोपर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे निधन झाले.

कै.बाळाराम वालकू पाटील (मयत) यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या वडिलोपार्जित वारसाहक्कातील व स्वकष्टार्जित मालकीच्या अशा खालील मिळकती होत्या.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | गाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पैसे.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोपर १६० ड | ४८ | २ | ०–०६–० | ०.९४ |

मयत कै.बाळाराम वालकू पाटील यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

यद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.बाळाराम वालकू पाटील (मयत) यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१८/०१/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.मुजावर सो
अर्जदारांचे वकील : ॲड.शांताराम चांगदेव बेडेकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१३६७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१०/०२/२०२२

१) श्रीमती.रजनी महेंद्र मोरे
रा.गोराई–१, दर्शन को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.२, रुम नं.अे/२७, बोरिवली, (पश्चिम) ४०००९१
२) सौ.शिल्पा राजेंद्र सिगनुर
रा.रुम नं.१७, बीपीटी कॅम्प, जमशेदजी बंदर,
लाला लिगम रोड, कुलाबा, मुंबई–४००००५
३) श्री.सचिन हरिश्चंद्र साळवी
रा.रुम नं.१५, बीपीटी कॅम्प, जमशेदजी बंदर,
लाला लिगम रोड, कुलाबा, मुंबई–४००००५ — अर्जदार
विरुद्ध
१) श्रीमती.प्रिया विलास जाधव उर्फ
प्रिया दिपक मोरे
रा.दर्या नगर, अमर स्वस्तिक मंडळ,
लाला निगम रोड, कुलाबा, मुंबई–४००००५
२) श्रीमती.गिता गणेश जाधव
३) सौ.प्राची गणेश जाधव
४) सौ.पदमिनी गणेश जाधव
क्रं.२ ते ४ रा.एफ–३, कासारवाडी,
पदमाबाई ठाकर रोड, माहिम, मुंबई–४०००२८
५) श्रीमती.गौतमी उर्फ स्मिता यशवंत कदम
रा.एफ–१, कासारवाडी, पदमाबाई ठाकर रोड,
माहिम, मुंबई–४०००२८ — सामनेवाले

अर्जदार हे कै.दाजी रामा जाधव यांचे वारस आहेत. कै.शालिनी हरिश्चंद्र साळवी ही कै.दाजी रामा जाधव यांची मयत मुलगी असून अर्जदार क्रं.१ व २ ह्या नाती आहेत. तर अर्जदार क्र.३ हा नातू आहे. तसेच सामनेवालेपैकी क्र.१ हा कै.दाजी रामा जाधव यांचा नातू असून सामनेवाले क्र.२ ही सुन आहे तर सा.क्र.३ व ४ ह्या नाती आहेत. तसेच सा.क्र.५ ही कै.दाजी रामा जाधव यांची मुलगी आहे. तरीही अर्जदार व सामनेवाले हे कै.दाजी रामा जाधव यांचे वारसदार आहेत. कै.दाजी रामा जाधव हे दि.१७/०३/१९९४ रोजी मौजे : कोयनावेळे, ता.पनवेल येथे मयत झालेले आहेत. तर कै.शालिनी हरिश्चंद्र साळवी ह्या कुलाबा, ग्रे.मुंबई, मुंबई येथे दि.१४/०९/२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. तरीही अर्जदार व सामनेवाले यांचे पश्चात कै.दाजी रामा जाधव यांना आणखी कोणीही जवळचे वारसदार नाहीत. कै.दाजी रामा जाधव यांच्या नावे पुढील नमूद मिळकती होत्या त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मिळकत क्र. | ठिकाण | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड | ४१ | अ/१८६ | ०–०३–०० | – |
| २ | मौजे घोट, ता.पनवेल, जि.रायगड | ५७ | ४ | ०–१०–०० | – |
| ३ | मौजे पेणधर, ता.पनवेल, जि.रायगड | २८४ | १० | ०–८९–०० | – |

वर नमूद मिळकती ह्या कै.दाजी रामा जाधव यांच्या नावे आहेत. मिळकत क्र.२ व ३ ह्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन केलेल्या मिळकती आहेत. त्यामध्ये मौजे : पेणधर येथील सर्व्हे क्रं.२८४/१० तसेच मौजे घोट येथील सर्व्हे क्रं.५७/४ या दोन सर्व्हे क्रमांकांसदरील जमीन मिळकती संपादीत झालेल्या आहेत. तरी त्याबाबतची नोंद संपादन यादीमध्ये नमूद आहे. तरीही त्या संपादनाच्या मोबदल्यात इतरत्र मौजे कोयनावेळे येथे भूखंड मिळणार आहेत. तसेच मिळकत क्रं.१ ही आजमितीसही अर्जदार यांचे आजोबा कै.दाजी रामा जाधव यांचे नावावर आहे. तरी अर्जदार व सामनेवाले यांचे नावाची नोंद होणेकरिता वारसदाखला मिळणे गरजेचे आहे. वर नमूद मिळकती ह्या कै.दाजी रामा जाधव यांच्या मालकीच्या असल्याने मिळकत क्र.२ व ३ यांचे संपादनाच्या मोबदल्यात भूखंड मिळणार असल्याने त्यांचा लाभ मिळणेकरिता तसेच मिळकत क्रं.१ ही अर्जदार व सामनेवाले यांचे नावे होणे करिता वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तरीही एम.आय. डी.सी.मध्ये वरील नमूद मिळकती क्रं.२ व ३ ह्या संपादन झाल्यानंतर त्याबाबत विचारणा केली असता त्यांचे कार्यालयाकडून तसेच मिळकत क्रं.१ करिता नावे नोंद होणेकरिता विचारणा केली असता मा.तलाठी सजा पेंधर अधिकाऱ्यांनी तसा कायदेशीर वारस असल्याचा दाखला आणण्यास सांगितले असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. तरीही अर्जदार व सामनेवाले हे कै.दाजी रामा जाधव यांचे वारस आहेत. परिणामी वर नमूद मिळकतीकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज क्र.१३६७/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे कै.दाजी रामा जाधव यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकती न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १८/१/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## कोर्लई येथे आरोग्य व रक्ततपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील कोर्लई येथे विजय सागर, शिवस्मृती, व तुळजाभवानी मच्छीमार संघटना, मुरूड ग्रामीण रुग्णालय येथील आय.सी.टी.सी.विभाग, मुरूड तालुका क्षयरोग विभाग, आरोग्य उपकेंद्र कोर्लई, प्राथमिक आरोग्य केंद्र बोर्ली-मांडला अंतर्गत महालॅब बोर्ली, लिंक वर्कर मुरुड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच आरोग्य व रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी आरोग्य उपकेंद्र कोर्लई येथील समुदाय आरोग्य अधिकारी एच.एस. फड, परिसेविका सुजाता भोसले, ग्रामीण रुग्णालय मुरूड येथील आयसिटीसी विभागातील समुपदेशक सचिन जाधव, पी पी एम सतिष दंतराव,वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक संकेत घरत, महालॅबचे जुतिका मगर, लिंक वर्कर उन्नती कचरेकर तसेच आशा स्वयंसेविका प्रमिला धोणसेकर, एलविन पेय, साक्षी आदी.उपस्थित होते. यावेळी आरोग्य विषयक एच.आय.व्ही/एड्स, क्षयरोगाबाबत सचिन जाधव, सतिष दंतराव व संकेत घरत यांनी माहिती देऊन लोकांमध्ये जनजागृती निर्माण केली. तसेच समुदाय आरोग्य अधिकारी एच. एस.फड व परिसेविका सुजाता भोसले यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करून लोकांमधील असलेले गैरसमज दूर केले. व जमलेल्या लोकांचे महा लॅबच्या जुतिका मगर यांनी ऐच्छिक रक्त संकलन करून, त्यांची सीबीसी, थायरॉइड, एच.आय.व्ही, ब्लड शुगर, व क्षयरोग तपासणीसाठी २३ जणांचे थुंकी नमुने घेऊन एकूण ५३ ग्रामस्थांची आरोग्य व रक्त तपासणी करण्यात आली.

## प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ई-श्रम कार्ड वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते मा.श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष, गुळसुंदे पंचायत समिती विभाग व जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने दापीवली येथे ई-श्रम कार्ड वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गुळसुंदे पंचायत समिती सदस्य जगदीश पवार यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले यावेळी मा.सरपंच प्रकाश गाताडे, गणेश म्हसकर, मनीषा गाताडे, सदस्य समृद्धी भगत, प्रमोद माळी, रामचंद्र माने, अनंता जाधव, मा.सदस्य प्राजक्ता गाताडे, निलेश तांडेल, भारत पवार व ग्रामस्थ उपस्थित होते.



# पर्यटन व वनसमृद्धी

वातावरणीय बदलाचे गंभीर परिणाम आपण सर्वचजण अनुभवत आहोत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण विभागाने दोन वर्षात अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत, तर कोविड-१९च्या प्रादुर्भावानंतर पर्यटकांना पुन्हा आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाने विविध योजनांचे नियोजन करून त्यांची अंमलबजावणी सुरू केली आहे.

**आदित्य ठाकरे**
**मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, पर्यटन, राजशिष्टाचार**

विकास हा महत्त्वाचा आहेच, पण तो शाश्वत आणि पर्यावरणपूरक असावा या दिशेने राज्याची दमदार वाटचाल सुरू आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांची संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेने दखल घेतली आहे. स्कॉटलंड येथे झालेल्या सीओपी-२६ (कॉन्फरन्स ऑफ द पार्टिज) कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्राला प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्वासाठी ‘अंडर २ कोलिशन फॉर क्लायमेट ॲक्शन’कडून पुरस्कार मिळाला आहे. स्कॉटलँडमध्ये तीनपैकी एक पुरस्कार जिंकणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे. राज्याच्या हवामान भागीद-ारी आणि क्रिएटिव्ह क्लायमेट सोल्युशन्सचीही येथे विशेष दखल घेतली गेली. महाराष्ट्राच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळाल्याचे समाधान आहे.

वनसमृद्धीत वाढ

राज्यात काम करताना पर्यावरण विभागाने सांगलीतील ४०० वर्षे जुने झाड केंद्राच्या मदतीने वाचवण्यात यश मिळवले. ९८०० हेक्टर कांदळवन भारतीय वन कायद्यात आणले. आरेचे ८०८ एकरचे जंगल वाचवण्यात यश आले. राज्यात नवीन जलाशये तयार केली आहेत. प्रशासनाच्या पातळीवर माझी वसुंधरा अभियान राबवण्यात आले. मुंबईसह राज्यात सुमारे २१ लाख झाडे लावली. राज्यात १६५० हरित क्षेत्रांची निर्मिती केली. २३७ जुनी हरित क्षेत्रे पुनर्जीवित केली. १.५० कोटी नागरिकांनी हरित शपथ घेतली. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचर्‍याचे शास्त्रीय पद्धतीने विलगीकरण, वर्गीकरण व उपचार केल्याने १०,६६३ टन कंपोस्ट खत दर महिन्याला तयार झाले. ज्याद्वारे ६३,९८२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे सेक्वेस्टरेशन करण्यात आले.

महत्त्वपूर्ण निर्णय

स्थानिक संस्थांना रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि पर्कोलेशन या प्रक्रियांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले गेले. याद्वारे महाराष्ट्र जेवढे पाणी एका दिवसात वापरतो तेवढे पाणी वाचवण्यात यश आले. एलईडी लाईट्स, सोलर पॅनल, रूफटॉप सोलर पॅनलचा वापर वाढवण्यात आला. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यासाठी सुधारित इलेक्ट्रिक वाहन धोरण आणले आहे. शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे, इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर बनवणे हा या धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाची सुरुवात सार्वजनिक वाहतुकीसाठी ही वाहने वापरून केली जात आहे. नदी, तळे व नाले यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये सहभागी संस्थांनी राज्यातील ७७५ जलसंस्था स्वच्छ करण्याचे काम केले. नूतनीकरणीय योग्य ऊर्जास्रोत, सौर ऊर्जा, एलईडी आणि पुनर्नविकृत ऊर्जा अभियानादरम्यान १२.२३ लाख एलईडी बल्ब तसेच ७० हजार सोलर लाईट्स लावण्यात आले. ज्यामधून १.४ लाख युनिट वीज वाचवण्यात मदत झाली. ग्रामीण भागात अभियानादरम्यान ७३६ बायोगॅस प्लांट व ७०१ सोलर पंप बसवण्यात आले. ज्यामुळे जवळपास ३२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. पहिल्याच वर्षात ३,७०,९७८ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. तुलना केल्यास हे प्रमाण १.७ कोटी मोठी झालेली झाडे जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तितके किंवा ३४ आरे जंगले जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तेवढे आहे.

हेरिटेज ट्री

वृक्ष संवर्धन अधिनियमानुसार ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे वृक्ष हे ‘हेरिटेज ट्री’ (प्राचीन वृक्ष) परिभाषित केले जाणार आहेत. वृक्षांचे वय हे हेरिटेज ट्री दर्जा देण्यासाठी व भरपाई वृक्षारोपण करण्यासाठी लागवड करावयाच्या झाडाची संख्या निश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचा पैलू आहे.

इंटरगव्हर्मेंटल पॅनल ऑन क्लायमेंट चेंज (आयपीसीसी) या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेने, वाता-वरणीय बदलाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अह-वालाचे राज्य मंत्रिमंडळापुढे सादरीकरण करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री यांच्या सह-अध्यक्षतेखाली ‘महाराष्ट्र वातावरणीय बदल परिषद’ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. **(क्रमशः)**

## महापालिकाद्वारे खारघरमधील बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या क्लीन मार्शल पथकाने खारघर मधील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करुन पदपथ मोकळे केल्याने खारघर मधील नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

खारघर मधील पदपथांवर बेकायदा फेरीवाल्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरुन चालावे लागत आहे. खारघर मध्ये पनवेल महापालिकेचे अतिक्रमण पथक आहे. मात्र, या अतिक्रमण पथकाकडून खारघर आणि तळोजा परिसर मोठा असल्यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांवर योग्य प्रकारे कारवाई केली जात नाही. खारघर मध्ये ‘सिडको’ने फेरीवाल्यांसाठी भूखंड उपलब्ध करुन देखील बहुतांश फेरीवाले पदपथ अडवून व्यवसाय करीत असल्यामुळे अनधिकृत फेरीवाल्यांवर पन-वेल महापालिकेने योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी खारघर मधील नागरिकांकडून केली जात होती. दरम्यान, पनवेल महापालिका प्रशासनाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र्य एजन्सीची नेमणूक केली आहे. नव्याने नेमणूक केलेल्या क्लीन मार्शल पथकाने महापालिका खारघर प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर सेक्टर- ७, ११, १२, १८, १९ आदी भागात पदपथावर व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करुन त्यांचे साहित्य जप्त केल्याने अनधिकृत फेरीवाले धास्तावले आहेत महाराष्ट्र राज्यात कोरोना आणि ओमायक्रॉन या ‘कोरोना’च्या नव्या व्हेरीएंटचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य सरकारने १० जानेव-ारी पासून कठोर निर्बंध लागू केले असून, हॉटेल, मॉल आणि थिएटर रात्री दहा वाजेपर्यंतच सुरु ठेवण्यास परवानगी दिली आहे. मात्र, खारघर मध्ये हॉटेल, चायनीज गाड्या सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने पनवेल महापालिका आणि खारघर पोलीस प्रशासनाने मोहीम राबवून दोन दिवसात रात्री १० नंतर जमावबंदी कायदा मोडणाऱ्या हॉटेल आणि खाद्यपदार्थ विक्रेत्या रेस्टॉरंटवर कारवाई करुन ६७,७०० रुपये दंड वसूल केल्याने हॉटेल मालकांचे धाबे दणाणले आहेत.



## अनधिकृत बांधकामांविरोधात पत्रकार किशोर साळुंके यांचे उपोषण

**दै.रायगड नगरी । खोपोली**

शहरातील अनधिकृत बांधकाम, बिल्डरांकडून सुरु असलेले बेकायदेशीर बांधकाम, राहत्या इमारतीच्या व टेरेसवरील अवैध बांधकाम, लोडबेरींगच्या नावाने करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम, बांधकाम शास्ती तसेच भाडेकरु घरपट्टी, बिल्डरांनी भाड्याने दिलेले सदनिकांबाबत कारवाई करणे व यातून पालिकेचे आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी पालिकेकडे वारंवार तक्रार अर्ज करुन देखील संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे, तसेच तक्रारी अर्जांना केराची टोपली दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत खोपोली शहरातील माहिती अधिकार कार्यकर्ते तथा बहुजन युथ पँथरचे खोपोली शहर अध्यक्ष पत्रकार किशोर साळुंके दि. २६ जानेवारी २२ रोजी उपोषण करणार असून खोपोली शहरातील विविध संघटनांनी या उपोषणाला पाठींबा दिला आहे.



खोपोली व खालापूर तालुक्यातील पत्रकार संघटनांनी सुद्धा या उपोषणाला जाहीर पाठींबा दिला असून बहुजन युथ पँथर संघटना खोप-ोली शहर अध्यक्ष यांच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले. सोमवारी सागर प्लाझा येथे झालेल्या बैठकीला पत्रकार सचिन यादव, दिलीप पवार, संदीप ओव्हाळ, सारीका सावंत, योगेश वाघमारे, बंटी साळुंके, डॉ. शेखर जांभळे, प्रशांत गोपाळे, प्रविण जाधव, हनुमान मोरे, गोकुळदास येशीकर, अरुण नलावडे, अमित भोपतराव, योगेश नखाते, पत्रकार परब, सुधीर माने, अंकुश मोरे, खलील सुर्वे, फिरोज पिंजारी, जयंत माडपे, हनुमंतराव ओव्हाळ, रवींद्र मोरे, अनिल वाघमारे, अनिल पाटील, संतोषी म्हात्रे, दिनेश पाटील, शिवाजी जाधव, तय्यब खान, आकाश जाधव, मनोहर कांबळे, प्रसाद अटक, दत्ता शेडगे आदी उपस्थित होते.

# पाली नगरपंचायत निवडणुकीतील ६० उमेदवारांचे भवितव्य आज ठरणार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्थगित नागरिकांचा मागास् वर्ग प्रवर्गाच्या निवडनुकांच्या जागा अनारक्षित करून घेण्यात येत असलेल्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या जागांसाठी सहा नगरपंचायतीची मतदान प्रक्रिया पार पडली. पाली नगर पंचायतीच्या ४ जागांसाठी मंगळवारी (ता.१८) निवडणूक संपन्न झाली. अष्टविनायकाचे धार्मिक तिर्थक्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वर देवस्थान व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२१ ची निवडणूक सर्वत्र चुरस पुर्ण लढत झाली. पाली नगरपंचायत निवडणुकीत आज ६० उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला होणार असल्याने उमेदवारांना धड्धड् वाढली आहे.

पालित अवघ्या चार जागांवर निवडणूक होत असल्याने दिवसभर मतदार मतदानासाठी येत होते. त्यामुळे मतदान केंद्रांवर तुरळक गर्दी पहायला मिळाली. तरीही दुपारी अडीच पर्यंत एकूण ५७ टक्के मतदान झाले होते. चार जागांसाठी १४ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. चारही मतदान केंद्रांवर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. काही मतदार आपल्या लहानग्यांना सोबत घेऊन मतदानासाठी आले होते. मतदात्यांचा उत्साह चांगला होता.

मंगळवारी (ता.१७) २, ५, ८ व १४ या चार प्रभागांचा व २१ डिसेंबरला झालेल्या १३ प्रभागांच्या निवडणुकीचा निकाल बुधवारी (ता.१९) लागणार आहे. अष्टविनायकाचे तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील ही पहिलीच नगरपंचायत निवडणूक असल्याने ही नगरपंचायत सर्वच पक्षांसाठी प्रतिष्ठेची आहे. या निवडणुकीत शिवसेना व भाजप वेगवेगळे लढत होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शेकाप यांनी आघाडी करून निवडणूक लढविली.

पालीतील शुद्धपाणी योजना, बाह्यवळण मार्ग, ग्रामीण रुग्णालय, नवीन बस स्थानक, तीर्थक्षेत्र विकास आराखडा अशा महत्वपूर्ण योजना व कामे कित्येक वर्षांपासून जैसे थे आहेत.

आम्हाला सत्ता दिल्यास हे सर्व प्रश्न आम्हीच मार्गी लावू व खरा विकास आम्हीच करू अशी आश्वासने सर्वच पक्षांचे नेते, मंत्री, आमदार व खासदारांनी दिली आहेत. अनेक आश्वासने आणि वायदे दिले आहेत. वास्तव्यात सत्ता आल्यावर कोणते प्रश्न मार्गी लागतील हे तेव्हाच कळेल.

## गोमांस विक्रीस नेणाऱ्या टोळीला जेरबंद करणाऱ्या नागोठणे पोलिसांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

गोवंश जातीच्या प्राण्यांची बेकायदेशीरपणे कत्तल करून ते मांस अवैधरीत्या मुंबई येथे विक्रीसाठी नेणाऱ्या पाच जणांच्या टोळीला नागोठणे पोलिसांनी दि.१६ रोजी जेरबंद केले होते. नागोठणे पोलिसांच्या या धडेकेबाज कामगिरीचे सर्वत्रच स्तरांतून कौतुक होत असताना नागोठणे येथील हिंदू जनजागृती समितीच्या वतीने नागोठणे पोलिस उपनिरीक्षक नारायण चव्हाण यांच्यासह पोलिस पथकाचे त्यांनी केलेल्या धडाकेबाज कामगिरी बद्दल त्यांचे दि. १७ रोजी सायंकाळी पोलिस ठाण्यात अभिनंदनाचे पत्र देत विशेष सन्मान करण्यात आला.

नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक नारायण चव्हाण यांच्यासह या धडाकेबाज कारवाईत सहभागी असलेल्या पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल सावंत देसाई, हे.कॉ. नितीन गायकवाड, हे.कॉ. ब्रिजेश भायदे, पो.ना. मिथुन मातेरे, पो.ना. सत्यवान पिंगळे व पो.कॉ.रामनाथ ठाकूर यांचेही विशेष कौतुक हिंदू जनजागृती समितीकडून यावेळी करण्यात आले. यावेळी ज्यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई करण्यात आली ते पोलिस उपनिरीक्षक नारायण चव्हाण यांनी हिंदू जनजागृती समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचे आभार मानले. तसेच कुलस्वामिनीच्या कृपेने १९८७ नंतर पुन्हा एकदा नागोठणे वासियांची सेवा करण्याची जी संधी मला मिळाली या संधीचा आपल्या सर्वांच्या सहकार्याने सोनं करून पोलिस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येकाला सहकार्य करत योग्य न्याय मिळवून देण्यासाठी मी पुरेपूर प्रयत्न करेन असेही चव्हाण यांनी उपस्थितांना सांगितले.



दरम्यान यावेळी गोवंश जातीच्या प्राण्यांची कत्तल करून गोमांस विकण्यासाठी नेणा-या या पाचही आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी यासाठी तसेच मा. न्यायालयाकडून या आरोपींनी केलेल्या घृणास्पद कृत्या बद्दल जामीन नाकारण्यात यावा यासंदर्भात हिंदू जनजागृती समितीच्या वतीने नागोठणे पोलिसांना एक निवेदन देण्यात आले. यावेळी हिंदू जनजागृती समितीचे अध्यक्ष योगेश ठाकुर, किशोर म्हात्रे, बापू महाराज रावकर, सुनिल लाड, चेनत कामथे, जितेंद्र जाधव, कुथे, ॲड. श्रीकांत रावकर, निलेश भोपी, राजेश शेडगे, रोहिदास हातनोलकर, संतोष जोशी, सचिन ठोंबरे, नितीन राऊत प्रज्योत कडव, प्रभु तांडेल, अल्विन नाकते, नरेश भंडारी यांच्या सह हिंदू जनजागृती समितीचे सदस्य उपस्थित होते.

## १ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या लोखंडी सेट्रींग प्लेटची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बिल्डींगच्या स्लॅबकरिता आणलेल्या लोखंडी सेट्रींग प्लेटची ज्याची किंमत जवळपास १ लाख ६० हजार रुपये इतकी आहे ती अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


नाना शंकर पाटील या ठेकेदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी वावंजे गाव येथील साई कुटीर बिल्डींग नं.०२, गाळा नं.१ या ठिकाणी बिल्डींग स्लॅब करिता लागणारी लोखंडी सेट्रींगच्या ८० प्लेट ज्याची किंमत एकूण १ लाख ६० हजार रुपये इतकी आहे. त्याची अज्ञात चोरट्याने शटरचे कुलूप तोडून गाळ्यात प्रवेश करून तो माल चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## माथेरानमधील जलप्राधिकरणाने रस्ते खोदल्यास दंड वसुलीची भाजपची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील काही वर्षांमध्ये माथेरानमध्ये अनेक ठिकाणी धूळविरहित रस्ते बनविण्याची कामे सुरू आहेत त्यामुळे येथील रस्ते क्ले पेव्हर ब्लॉक ने केले जात आहेत पण हे रस्ते पूर्ण झाल्यानंतर माथेरान जल प्राधिकरण किव्हा काही लोक हे रस्ते खोदून जलवाहिनी टाकत आहे अशी तक्रार माथेरान भारतीय जनता पक्षाने माथेरानच्या मुख्याधिकारी सौ सुरेखा भणगे यांच्याकडे लेखी स्परूपात केली आहे.

माथेरान मध्ये रस्ते व प्रेक्षणीय स्थळे सुशोभीकरणास मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्याने येथील रस्ते व अनेक पॉईंट सुशोभित झाले आहेत. एवढा मोठा निधी भविष्यात पुन्हा लवकर मिळणार नसल्याने झालेले रस्ते टिकविणे ही काळाची गरज आहे. पण गावातील नव्याने झालेल्या रस्त्यांवर काही लोक खोदकाम करून जलवाहिनी टाकत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर माथेरान भाजपाने माथेरान पालिकेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सौ सुरेखा भणगे यांच्या कडे निवेदन देऊन अनेक गोष्टींची मागणी केली आहे. त्यात प्रामुख्याने विनापरवानगी अशा प्रकारे रस्ते खोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच गेली अनेक वर्षे येथील नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम कासव गतीने सुरू त्या ठेकेदाराने वेळेत काम न करता नव्याने झालेले रस्ते खोदल्यास त्यावर ही तातडीने कारवाई व्हावी. तसेच पूर्वी रस्ते खोदकाम करताना पालिकेकडून परवानगी घेताना अनामत रक्कम घेतली जात असे तो नियम लागू करून रस्ते खोदणाऱ्याकडून त्याचा खर्च घेण्यात यावा अशा अनेक मागण्या ह्यावेळी आपल्या निवेदनामध्ये करण्यात आल्या ह्यावेळी भाजपा शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, किरण चौधरी, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे व दीपक शाह हेही उपस्थित होते.



## उरण तालुक्यात विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वकृत्व स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांतील लहान गट १ ली ते ५ वी व मोठा गट ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तसेच खुला गट शिक्षकांसाठी हिन्दुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जय महाराष्ट्र शिक्षक व कर्मचारी सेनेने तर्फे ऑनलाईन वत्कृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर स्पर्धेकाने दिलेल्या विषयावर व वेळेवर आपल्या भाषणाचा व्हिडिओ शाळेच्या गणवेशात व व्हिडिओ खाली स्वतःचे नाव इयत्ता, व शाळेचे नाव टाकून लहान गटाने रमणिक म्हात्रे मो - ९८७०९४८८४१ या नंबरवर व मोठा गट तसेच खुला गट बबन पाटील मो - ९००४६२७८५६ या नंबरवर व्हिडिओ दि. २२ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत पाठवावा. या स्पर्धेत लहान गटास व मोठ्या गटास प्रथम क्रमांकास रोख बक्षिस ५०० रु व सन्मान चिन्ह , द्वितीय क्रमांकास रोख बक्षिस ३०० व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकास रोख बक्षिस २०० रू सन्मानचिन्ह व उत्तेजनार्थ सन्मानचिन्ह देण्यात येईल तसेच खुल्या गटास प्रथम , द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांकास सन्मानचिन्ह बक्षिस सोमवार दिनांक २४ जानेवारी २०२२ ला होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देण्यात येईल.

सदर स्पर्धेचे विषय लहान गट छत्रपती शिवाजी महाराज, वेळ ३ मिनीटे, मोठा गट, राष्ट्रमाता जिजाऊ, वेळ ४ मिनिटे ; खुला गट हिन्दु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, वेळ ५ मिनीटे; तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जय महाराष्ट्र शिक्षक व कर्मचारी सेनेचे जिल्हाध्यक्ष नरेश मोकाशी,संपर्क प्रमुख निर्भय म्हात्रे, सरचिटणीस बबन पाटील, उपाध्यक्ष तथा उरण शिक्षक पतपेढी संचालक रमणिक म्हात्रे, तालुका अध्यक्ष बळीराम पाटील, रायगड जिल्हा महिला संघटक सौ.संपदा चव्हाण, कोषाध्यक्ष के. आर.म्हात्रे, सल्लागार हि.सो.म्हात्रे, बी.जे.म्हात्रे, अनिल म्हात्रे जय महाराष्ट्र शिक्षक व कर्मचारी यांच्या कडून करण्यात आले आहे.